ePaper

# वाढत्या तापमानात आज मतदान; राज्यात 8 जागांवर 204 उमेदवार रिंगणात



|| वर्ष - 7 | अंक - 337 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- विराट कोहलीने केला अनोखा विक्रम
- अभिनेत्री तमन्ना भाटिया अडचणीत
- राष्ट्रवादी पक्षाचा 'शपथनामा' जाहीर
- ठाकरे गटाचा वचननामा जाहीर


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 26 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मोदींच्या नेतृत्वात एनडीए यशस्वी घोडदौड करणार

# देशात नरेंद्र मोदींना पर्याय नाही!

### » राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांची स्पष्टोक्ती

। मुंबई। महाईन्यूज

**'भारताचा गेल्या १० वर्षात वेगाने विकास झाला आहे, लोकोपयोगी कामे झाली आहेत. जनतेत नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व लोकप्रिय आहे. त्यामुळे सध्याच्या घडीला देशात नरेंद्र मोदी यांना पर्याय नाही', अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी गुरुवारी मांडली. 'विरोधी पक्ष पूर्णपणे विखुरलेला असून त्यांच्यात एकवाक्यता नाही. केवळ फोटो काढण्यापुरते विरोधक एकत्र येत असून त्यांच्यात एकसूत्रता नाही. त्यामुळे आगामी निवडणुकीत मोदींच्या नेतृत्वात एनडीए यशस्वी घोडदौड करेल', असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**



राष्ट्रवादीच्या फुटीपासून राष्ट्रीय राजकारणाविषयी पटेल यांनी अनेक खुलासे केले. 'नरेंद्र मोदी यांच्यामुळे लोकसभा निवडणूक ही अध्यक्षीय निवडणुकीसारखीच भासू लागली आहे. कारण त्यांना सक्षम पर्याय कोण, हा प्रश्न केवळ राजकारणीच नाही तर जनताही विचारू लागली आहे. अनेक लोकोपयोगी योजना मोदी सरकारने देशात राबविल्या. जनतेला त्याचा थेट फायदा मिळू लागला. यामुळे देशाला विकासाच्या वाटेवर नेऊ शकणारे नेते म्हणजे मोदी, ही जनतेची ठाम धारणा असून त्यामुळेच आगामी निवडणुकीत त्यांना यश मिळेल', असा विश्वास पटेल यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादीच्या फुटीविषयी बोलताना पटेल यांनी भूतकाळातील काही घटनांचा आधार घेतला. 'ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने भाजपला बाहेरून पाठिंबा दिलाच होता. २०१९मध्ये झालेला पहाटेचा शपथविधीही पवार यांच्याच आशीर्वादाने झाला होता. त्यामुळे भाजप आपल्याला अस्पृश्य नाही, हा विचार राष्ट्रवादीच्या आमदारांत रुजला होता. त्यातही कट्टर हिंदुत्ववादी शिवसेनेपेक्षा भाजप वाईट नाही, असाही विचार सगळ्यांच्या मनात आला', असे पटेल म्हणाले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या आयुष्यात सर्वाधिक टीका शरद पवार यांच्यावरच केली, हेही आपण विसरून चालणार नाही, याची आठवण पटेल यांनी करून दिली. 'महाविकास आघाडी स्थापन झाल्यापासून जशी शिवसेनेच्या आमदारांत अस्वस्थता होती, तशी राष्ट्रवादीच्या आमदारांतही वाढीस लागली होती. परंतु, करोनाकाळ आला आणि राजकारण पूर्णपणे थंडावले.

### 'राष्ट्रवादीला दोन राज्यसभा जागा'

»'जागावाटपात सातारा ही जागा राष्ट्रवादीने भाजपला सोडली. परंतु, त्याबदल्यात आम्ही राज्यसभेची जागा मागितली होती. अमित शहा यांनी पियुष गोयल यांची रिकामी होणारी जागा आम्हाला देऊ केली आहे, असे पटेल यांनी सांगितले. त्यामुळे माझी, शिवाय नुकतीच मी राजीनामा दिल्याने रिक्त झालेली आणि गोयल यांची अशा तीन राज्यसभा जागा पक्षाकडे असतील', असे पटेल म्हणाले.

### 'मुख्यमंत्रिपदाचे वाटप व्हायला हवे होते'

»'काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी आणि पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी महाविकास आघाडी ही कल्पनाच उडवून लावली होती. परंतु, शरद पवार यांनी दिल्लीत जाऊन त्यांची समजूत काढली. पुन्हा पवार यांनीच आग्रह करून उद्धव ठाकरे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घातली. त्यानंतर मुख्यमंत्रिपद काही काळासाठी राष्ट्रवादीला द्यावे, असा प्रस्ताव घेऊन मी स्वतः उद्धव यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी पद अडीच किंवा दोन वर्षे तरी राष्ट्रवादीला द्यावे, असा प्रस्ताव मी त्यांच्या पुढ्यात ठेवला. मात्र ते काहीच बोलले नाहीत. पवारांनीही त्यावर काहीच भूमिका घेतली नाही', याविषयी पटेल यांनी आश्चर्य व्यक्त केले.

## ही लढाई पवार विरुद्ध पवार, मात्र सुनेत्रा वहिनींच होणार लोकसभेवर सवार!

### » रामदास आठवलेंची भन्नाट शायरी, नरेंद्र मोदींनी वाढवली देशामध्ये विकासाची गती...

। बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ही लढाई आहे पवार विरुद्ध पवार.. पण आमच्या वहिनींच होणार आहे लोकसभेवर सवार.. आता बारामतीची जनता राहिली नाही गवार.. म्हणूनच बारामतीचा किल्ला सर करणार आहेत अजित पवार..बरेच वर्ष शरद पवार यांचा मी होतो साथी.. पण आता मी आहे अजितदादांचा साथी.. त्यामुळेच मी आलो आहे सुनेत्रा वहिनींना निवडून देण्यासाठी बारामतीत.. नरेंद्र मोदी यांनी वाढवली आहे देशामध्ये विकासाची गती म्हणूनच बारामतीत विजय होणार आहे आपली महायुती, अशी शेरोशायरी करत रामदास आठवले यांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित सभा गाजवली.**



केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आज बारामती दौऱ्यावर होते. बारामतीत सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ त्यांची सभा पार पडली. महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार या चांगल्या मताने निवडून येतील, असा विश्वास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला. महाविकास आघाडीकडून संविधान बदलणार असल्याचा आरोप केला जात आहे. याबाबत बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जाहीर केले आहे की, संविधान बदलण्याची ताकद कोणामध्येही नाही. संविधान बदलण्याचा विषय अजिबात नाही. संविधान इतके पवित्र आहे की, त्याला कोणीही हात लावू शकत नाही. विरोधकांकडे दुसरा मुद्दा नसल्यामुळे तसेच दलित आणि अल्पसंख्या मध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी इंडिया आघाडीकडून आणि महाविकास आघाडीकडून लोकशाही धोक्यात असल्याचा अपप्रचार केला जात आहे.

### विरोधकांवर साधला निशाणा

» आज मात्र या देशात आलेली आहे नरेंद्र मोदी यांची आंधी, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विकासाच्या दिशेने भरधाव वेगाने चाललेले एक मोठे घोडे स्वार आहेत. त्यांचा हा घोडा थांबविण्यासाठी विरोधक प्रयत्न करत आहेत. मात्र नरेंद्र मोदींचा घोडा अडवण्याची ताकद त्यांच्यात नाही, असं म्हणत आठवले यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

## प्रचंड गर्दीत मुरलीधर मोहोळ यांचा उमेदवारी अर्ज दाखल

# पुण्यात कमळच; मोदींसाठी मोहोळच!

### देवेंद्र फडणवीसः मोहोळ यांच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'मुरलीधर मोहोळ यांना निवडून आणण्यासाठी पुणेकरांमध्येच प्रचंड उत्साह आहे. पुणेकरांनीच ठरवले असल्यामुळे मोहोळ यांच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी आहे आणि त्यावर फक्त शिक्कामोर्तब व्हायचं आहे,' असे सांगून 'संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला मागच्या वेळेपेक्षा अधिक जागा मिळतील,' असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज(दि.25 एप्रिल) रोजी व्यक्त केला.**




भारतीय जनता पक्षासह घटक पक्षांच्या महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी गुरुवारी सकाळी पुणे लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज भरला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

'पुण्यात लोकांचे भाजप आणि महायुतीवर प्रेम आहे. महापौर म्हणून खूप चांगले काम केलेला उमेदवार आम्ही दिला आहे आणि जनता आमच्या पाठीशी आहे. दिवंगत गिरीश बापट यांनी पुण्यात कार्यकर्त्यांचा अतिशय चांगला वारसा आम्हाला दिला आहे. त्यामुळे इथे मुरलीधर मोहोळ निवडून येतील याबद्दल आमच्या मनात शंका नाही' असेही फडणवीस (Pune) म्हणाले.'जे 543 जागांमध्ये फक्त 10 जागा उभ्या करतात, त्यांच्या जाहीरनाम्याला काय अर्थ आहे' अशा शब्दांत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या जाहीरनाम्यावरही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे,खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, रुपाली चाकणकर, माजी आमदार योगेश टिळेकर, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, सुनील देवधर, शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, मनसे नेते बाबू वागस्कर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहर अध्यक्ष नाना भानगिरे, पिंपरी-चिंचवडचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, मनसेचे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर, आरपीआयचे शहर अध्यक्ष संजय सोनावणे या वेळी उपस्थित होते. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारार्थ पुणे शहरातून पदयात्रा काढण्यात आली. ही नियोजित पदयात्रेची सुरुवात महर्षी धोंडो केशव कर्वे पुतळ्यापासून सुरु झाली. पदयात्रेसाठी मार्गिका महर्षी धोंडो केशव कर्वे पुतळा, श्री मृत्युंजयेश्वर मंदिर, श्री दशभुजा गणपती मंदिर, नळस्टॉप मेट्रो स्टेशन, गरवारे महाविद्यालय, स्वातंत्र्यवीर स्मारक या मार्गे खंडोजीबाबा चौक अशी निश्चित करण्यात आली होती. खंडोजीबाबा चौक येथे पदयात्रेचा जाहीर सभेने समारोप झाला.दरम्यान ठिकठिकाणी पदयात्रेचे जल्लोषात स्वागत झाले. फुलांचा वर्षाव आणि भव्य पुष्पहाराच्या माध्यमातून स्वागत केले गेले.प्रचारसभा सुरू असताना महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ हे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पुणे लोकसभा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे रवाना झाले.

#### आई-वडिलांचे आशिर्वाद घेऊन प्रारंभ...

» अत्यंत उत्साही वातावरणात सकाळी कोथरूड येथील महर्षि कर्वे यांच्या पुतळ्यापासून मोहोळ यांच्या रॅलीला प्रारंभ झाला. तत्पूर्वी मोहोळ यांनी आई-वडिलांचे आशिर्वाद घेतले व ग्रामदेवता कसबा गणपतीला वंदन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन केले. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या कसब्यातील जनसंपर्क कार्यालयात असलेल्या प्रतिमेसही अभिवादन केले. पुणेकरांनीच ठरवले असल्याने पुण्यात मोहोळ यांचा विजय सहज होईल. त्यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या अनेक योजना पुण्यात राबवल्या आहेत. भविष्यातही त्यांची दूरदृष्टी पुणेकरांना एक चांगला खासदार निवडल्याची अनुभूती देईल,अशी खात्री वाटते असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

#### पुणेकरच मला निवडून देतील

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेने आज उमेदवारी अर्ज भरला.पुणेकरांची सेवा आजवर करत आलो आहे. आता थोड्या व्यापक स्वरुपात ही सेवा करण्याची संधी पुणेकर देतील हा विश्वास आजची अलोट गर्दी पाहून निर्माण झाला असून मी पुणेकरांचा उमेदवार आहे आणि पुणेकरच मला निवडून देतील असे महायुतीचे अधिकृत उमेदवार मुरलीधर मोहोळ म्हणाले.

---

## शिरूरमधून आढळराव पाटील हेच विजयी होतील!

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघापाठोपाठ सर्वांचेच लक्ष लागून राहिलेल्या शिरूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल करण्यात आला.**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अर्ज भरण्यात आला. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार आढळराव पाटील हेच निवडणुकीत विजयी होतील, असा विश्वास अजित पवारांनी व्यक्त केला. मात्र, आढळरावांना किती मताधिक्य मिळेल, या प्रश्नावर मी काही ज्योतिषी नाही, असे थेट उत्तरच त्यांनी दिले.लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरदार सुरू असून, सर्वच मतदारसंघात प्रचाराचा धुरळा उडत आहे.

राष्ट्रवादी फूट पडल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यात सत्ताधारी असलेल्या शिंदे-फडणवीस सरकारला आपला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर सत्तेत सहभागी होत लोकसभेच्या निवडणुकीला महायुतीत सहभागी होण्याचा निर्णय अजित पवारांनी घेतला.

महायुतीच्या जागावाटपामध्ये पुणे जिल्ह्यात समावेश असलेल्या चार जागांपैकी बारामती, शिरूर या दोन जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आली. राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे हे आपल्याकडे येतील असे अजित पवार यांना वाटत होते. मात्र, कोल्हे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याबरोबर राहणे पसंत केले.खासदार कोल्हे शरद पवार यांच्याबरोबर गेल्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीत कोल्हे यांचा पराभव करणार म्हणजे करणारच, असा संकल्प उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोडला. जाहीर सभांमध्ये अजितदादांनी कोल्हे यांचा पराभव करण्याचे बोलून दाखविले होते. त्यासाठी उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी अजित पवार यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघात दौरे करून नागरिकांशी संवाददेखील साधला होता. खासदार कोल्हे यांच्या विरोधात उभे राहण्यासाठी अजित पवार यांना सक्षम उमेदवार मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गट यांचे नेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देऊन त्यांना अमोल कोल्हे यांच्या विरोधात उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदारसंघातून निवडणूक लढविणारे कोल्हे आणि आढळराव या दोन्ही उमेदवारांमध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपांचा कलगीतुरा रंगत आहे. महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविणारे अमोल कोल्हे यांनी गेल्या आठवड्यात आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

#### जाहीरनामा वाचला नाही

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपला शपथनामा प्रसिद्ध केला आहे. या शपथनाम्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विचारले असता, ते म्हणाले माझा त्या पक्षाची काहीही संबंध नाही, मी तो जाहीरनामा वाचला नाही, वाचल्याशिवाय उत्तर देणार नाही. ते विरोधक आहेत. त्यामुळे ते सत्ताधारी पक्षावर आरोप करणारच ते त्यांचे काम आहे. पण देशात मोदी सरकारने अनेक कामे केली आहेत. यापुढील काळातही करतच राहतील, असे अजित पवार म्हणाले.

# श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे 28 जूनला प्रस्थान!

## 19 दिवसांचा प्रवास करून पायी पालखी सोहळा 16 जुलै रोजी पंढरीत दाखल होणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून २८ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. १९ दिवसांचा प्रवास करून हा पायी पालखी सोहळा १६ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. १७ ते २० जुलै रोजी हा पालखी सोहळा पंढरपूर येथे मुक्कामी राहणार आहे. वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी पालखी प्रस्थानाची घोषणा झाली आहे. यंदा पालखी सोहळ्याचे ३३९ वे वर्ष आहे.**



याबाबतची माहिती देहू देवस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी दिली. पालखी सोहळा प्रमुख म्हणून विशाल मोरे, माणिक मोरे, संतोष मोरे महाराज यांची निवड करण्यात आली आहे. संत तुकारामांच्या पालखी सोहळ्याची हजारो विठ्ठल भक्त प्रतीक्षा करत असतात. प्रस्थान ठेवल्यानंतर इनामदार वाड्यात पालखी सोहळा पहिला मुक्काम करणार आहे. संत तुकारामांची पालखी १६ जुलै रोजी पंढरीत दाखल होणार असून १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या सोहळ्यात पालखी सोहळ्यातील वारकरी सहभाग घेणार आहेत. आषाढी पालखी सोहळ्याची घोषणा झाल्याने वारकरी संप्रदायात आनंदाचे वातावरण आहे

### पालखी सोहळ्याचा कार्यक्रम

२८ जूनला दुपारी दोन वाजता पालखी प्रस्थान होणार असून पालखीचा पहिला मुक्काम इनामदार वाड्यात. २९ जूनला पालखी सोहळा आकुर्डीत मुक्कामी असणार आहे. ३० जूनला पालखी पुण्यात दाखल होणार असून दोन दिवस नाना पेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असणार आहे. २ जुलैला पालखी सोहळा लोणी काळभोरला, ३ जुलैला, ४ जुलैला वरवंड, ५ जुलैला उडंवडी गवळ्याची, ६ जुलैला बारामती शारदा विद्यालय, ७ जुलैला सणसर पालखी तळ, ८ जुलैला पालखी आंथुर्णेत मुक्कामी असून बेलवाडीत दुपारी पहिले गोल रिंगण होणार आहे. ९ जुलैला निमगाव केतकी, १० जुलैला इंदापूर पालखी तळावर मुक्काम असून दुपारी गोलरिंगण होणार आहे. ११ जुलैला सराटी पालखी तळ, १२ जुलैला अकलूज माने विद्यालय पालखी तळावर मुक्कामी असून दुपारी गोल रिंगण होणार आहे. १३ जुलैला बोरगाव येथे मुक्कामी असून दुपारी माळीनगर उभे रिंगण होणार आहे. १४ जुलैला पिराची कुरोली, १५ जुलैला वाखारीला उभे रिंगण होणार आहे. १६ जुलैला श्री क्षेत्र पंढरपूर संत तुकाराम महाराज नवीन इमारत येथे पालखी सोहळा दाखल होणार असून याठिकाणी उभे रिंगण होणार आहे. १७ जुलै रोजी आषाढी एकादशीच्या सोहळ्यात पालखी सोहळ्यातील वारकरी सहभाग घेणार आहेत. चार दिवसांच्या पंढरीतील मुक्कामानंतर २१ जुलैला पालखी सोहळ्याचा परतीचा प्रवास

### पालखी मार्गाची पाहणी केली जाणार

पालखी सोहळ्यानिमित्त संत तुकाराम महाराज संस्थानाची जय्यत तयारी सुरू आहे. देहू ते पंढरपुर या पालखी मार्गावर वारीतील वारकऱ्यांना विविध सुविधा देण्यासाठी एक महिना अगोदर पालखी मार्गाची पाहणी केली जाणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख विशाल महाराज मोरे यांनी सांगितले.

---

# मावळ लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार?

## शेवटच्या दिवशी 'वंचित'कडून उमेदवारी अर्ज दाखल

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज



**आतापर्यंत मावळ मतदारसंघात महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीकडून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहेत. देशात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे.**

विविध लोकसभा मतदारसंघांत इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज भरले जात आहेत. अशातच मावळ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. शेवटच्या दिवशी मावळ लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीकडून माधवी जोशी यांनीदेखील उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे आता मावळ लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

आतापर्यंत मावळ मतदारसंघात महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे (Srirang Barne) आणि महाविकास आघाडीकडून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, आज शेवटच्या दिवशी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल झाल्यामुळे मावळ लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होऊ शकते. वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवार असल्यामुळे आता मत विभागली जाणार असून, याचा फटका शिंदेच्या शिवसेनेला की ठाकरेंच्या शिवसेनेला बसणार हेच पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### म्हणून जोशी यांचा वंचितमध्ये प्रवेश

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत येथील माधवी जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. मात्र, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे जोशी यांनी वंचितमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळविली.

---



# नदीपात्रात राडारोडा टाकल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल

। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मुळा नदीपात्रात बांधकामाचा राडारोडा टाकल्याप्रकरणी सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई 27 मार्च रोजी पिंपळे निलख येथे करण्यात आली असून याप्रकरणी बुधवारी (दि. 24 एप्रिल) सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.हरिभाऊ काळूराम साठे (वय 62), ज्ञानोबा काळूराम साठे (वय 65), अमोल बबन साठे (वय 55), लक्ष्मण कोंडीबा कामठे (वय 60), सुभाष कोंडीबा कामठे (वय 58, सर्व रा. पिंपळे निलख) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी स्वप्निल मनोहर पाटील (वय 38, रा. पिंपरी) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील नद्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा राडारोडा टाकण्यास तसेच नदी प्रदूषण करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. असे असताना देखील आरोपींनी बांधकामाचा राडारोडा मुळा नदीमध्ये टाकला. यामुळे भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबत आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.




# घोटाळा झालाच नाही.. मग दोषी कोण?

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा, सिंचन घोटाळा, महाराष्ट्र सदन घोटाळा अशा साऱ्याच गाजलेल्या घोटाळय़ांमध्ये काहीही तथ्य नाही असे म्हणत सरकारी यंत्रणाच न्यायालयात एकापाठोपाठ अर्ज दाखल करीत असल्याने महाराष्ट्रात कायद्याचे राज्य ही संकल्पना पार पायदळी तुडवली जात आहे.**

याचे नवीन उदाहरण म्हणजे २५ हजार कोटींच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार यांचा काहीही संबंध नाही, सबब हे प्रकरण बंद करण्यात यावे म्हणून आर्थिक गुन्हे शाखेने जानेवारी महिन्यातच न्यायालयात केलेला अर्ज. तेव्हा त्याची फारशी वाच्यता झाली नव्हती. मात्र अलीकडेच हा अहवाल खुला झाला. त्याचे कारणही स्पष्ट आहे. सुनेत्रा पवार या बारामती लोकसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणूक लढवीत आहेत. नणंद – भावजयीमध्ये म्हणजे घरातच ही लढत असली तरी सुनेत्रा पवार यांच्यावर बँक घोटाळयातील आरोपी हा शिक्का असणे केव्हाही त्रासदायकच होते. यामुळेच पोलिसांचा अहवाल निवडणुकीच्या तोंडावर माध्यमांमध्ये आला हे उघडच दिसते. सुनेत्रा पवार यांना क्लीन चिट मिळाल्याने साखर कारखान्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांचे नातू आमदार रोहित पवार आणि जयंत



पाटील यांचे भाचे आमदार प्राजक्त तनपुरे हेसुद्धा सहीसलामत या प्रकरणातून सुटले.‘जरंडेश्वर’ साखर कारखाना खरेदीप्रमाणेच ‘बारामती ॲग्रो’ या रोहित पवारांशी संबंधित कारखान्याने ‘कन्नड’ सहकारी साखर कारखाना खरेदीत काहीही गैर नसल्याचा निर्वाळा पोलिसांना दिला आहे. अजित पवार महाविकास आघाडी किंवा एकत्रित राष्ट्रवादीत असताना पोलीस आणि ईडी या यंत्रणांना या व्यवहारात पैसे हडप केले गेल्याचे आढळले होते. २०२० मध्ये अजित पवार महाविकास आघाडी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असताना पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या घोटाळयाचे प्रकरण बंद करण्याचा अहवाल सादर केला होता. पण महाविकास आघाडीचे सरकार गडगडल्यावर नवीन सरकारच्या काळात पोलिसांनी अधिक तपास करायचा म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केला होता. अजित पवार यांनी भाजपशी हातमिळवणी केल्यावर पुन्हा आर्थिक गुन्हा शाखेने प्रकरण बंद करण्याचा अर्ज दुसऱ्यांदा दाखल केला. अशा रीतीने आर्थिक घोटाळयाच्या तपासाचा पोरखेळ झाला आहे. अजित पवार सत्ताधारी पक्षात असल्यावर सारे माफ आणि विरोधी पक्षात असल्यावर पुन्हा तपास. घोटाळा झाला असे ईडी आणि आर्थिक गुन्हे शाखेला आधी आढळले होते. ईडीने तशी न्यायालयात भूमिका घेतली आहे. मग आता तपास बंद करण्याचे कारण काय, याचे उत्तर तपास यंत्रणेला द्यावे लागेल.हा प्रकार फक्त बँक घोटाळयापुरता सीमित नाही. अजित पवार यांच्यावर सुमारे ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळयाचा आरोप झाला. त्यातून पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हा विरोधात असलेल्या भाजपने सिंचन घोटाळयाबाबत किती आरोप केले. देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे आदी पुरावे सादर करण्यासाठी बैलगाडीतून गेले होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने सिंचन घोटाळयाचे केवढे तरी काहूर माजविले होते. पण २०१४ ते २०१९ या फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात ‘चौकशी सुरू’ या पलीकडे सिंचन घोटाळयात काहीच कारवाई झाली नाही. छोटया-मोठया अधिकाऱ्यांची तुरुंगवारी झाली, पण बडे मासे मोकळेच राहिले. सुमारे ७० हजार कोटी खर्च करूनही सिंचनाचे प्रमाण फक्त .१ टक्के वाढल्याचा मुख्य आक्षेप होता. मग पैसे गेले कुठे, असा सवाल तेव्हा विरोधकांनी केला होता. सिंचन घोटाळयाचा आरोप झाल्यापासून आजतागायत राज्यात सिंचनाचे प्रमाण किती वाढले याची आकडेवारी सरकार सादर करू शकलेले नाही. फडणवीस सरकारच्या काळातही ‘आकडेवारी उपलब्ध नाही’ एवढीच माहिती दिली जात होती. राष्ट्रीय पातळीवर सरासरी ५१ टक्के शेतीचे क्षेत्र सिंचनाखाली आले असताना महाराष्ट्रात हे प्रमाण १८ टक्क्यांपेक्षा जास्त नाही. ७० हजार कोटी खर्च करूनही सिंचनाचे क्षेत्र वाढले नसल्यास पैसे झिरपले कुठे, याचे उत्तर कोणीच देऊ शकत नाही. महाराष्ट्र सदन घोटाळयात किती ओरड झाली. छगन भुजबळ यांना दोन वर्षे तुरुंगात काढावी लागली. भुजबळांनी टोपी बदलली आणि महाराष्ट्र सदन घोटाळयातून भुजबळांनाही अभय मिळत गेले.

## संपादकीय »

### ‘आ’ आणि ‘उ’!

***शिक्षणासाठी परदेशगमन करणारे जवळपास निम्मे विद्यार्थी असे सांगतात की आपल्या देशातील शिक्षणाच्या दर्जाविषयी ते समाधानी नाहीत.***

धार्मिक, सामाजिक, आर्थिक मुद्दय़ांपेक्षाही या देशासमोरील सर्वात मोठे आव्हान हे परदेशात शिक्षणाच्या मिषाने जाऊ इच्छिणारे विद्यार्थी हे आहे हे ‘लोकसत्ता’ वारंवार सांगत आला आहे. हे सत्य एका ताज्या पाहणीतून पुन्हा एकदा अधोरेखित होत असल्याने त्यावर पुन्हा एकदा भाष्य करण्याची निकड निर्माण होते. याआधी ‘पाऊले चालती..लोकसत्ता’ने देशत्याग करू इच्छिणाऱ्यांच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त केली होती. कारणे काहीही असोत. पण मोठया संख्येने भारतीयांस देश सोडावा असे वाटू लागणे ही बाब सर्वार्थाने गंभीर ठरते. दोन वर्षांपूर्वी रशियाने युक्रेनवर हल्ला केला तेव्हा त्या देशातील विद्यापीठातून इतके भारतीय विद्यार्थी भसाभस बाहेर आले की ती संख्या पाहून सर्वच अचंबित झाले. वास्तविक युक्रेन हा काही भारतीयांनी आवर्जून शिक्षणासाठी आनंदाने जावे.

खासगी विनाअनुदानित शाळेच्या एक किलोमीटर परिघात शासकीय किंवा अनुदानित शाळा असल्यास खासगी शाळेला आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा आरक्षित ठेवण्याची गरज नाही, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

# वर्गभेद निर्माण करणारा शिक्षण हक्क!

यातून श्रीमंतांसाठी इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळा आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी सरकारी शाळा अशी विभागणी होताना दिसते..निवडणुकीच्या रणधुमाळीत शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. यात महाराष्ट्र सरकारने खासगी विनाअनुदानित शाळांवर मेहरबानी दाखविलेली दिसते. वंचित, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्काचे काय, हा प्रश्न निवडणुकीच्या गदारोळात हरवून जाणे योग्य नाही. ३ एप्रिल २०२४ ला शिक्षण संचालकांनी काढलेल्या या परिपत्रकामुळे झोपडपट्टी, तांडा, वाडे, गाव-शहर आदी ठिकाणी राहणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सरकारी किंवा अन्य अनुदानित शाळा उपलब्ध असेल, तर त्यांचे खासगी विनाअनुदानित शाळांत शिकण्याचे स्वप्न धूसर होणार आहे. संविधान अस्तित्वात आल्यापासून पहिल्या १० वर्षांच्या आत ६ ते १४



वयोगटातील सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्यास सुरुवात व्हावी, अशी संविधान निर्मात्यांची अपेक्षा होती. संविधानातील अनुच्छेद ४५ मध्ये त्याबाबतची तरतूदही आहे. भारतासह जगातील ७१ देशांनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यावर स्वाक्षरी केली आहे. या करारनाम्यात मोफत प्राथमिक शिक्षणाचा अधिकार व सुधारणावादी उच्च शिक्षणाचा अधिकार मान्य करण्यात आला. प्रत्यक्षात भारतातील शैक्षणिक क्षेत्रात अपेक्षित गतीने बदल होत नव्हता. परिणामी देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दबाव वाढू लागला. २००२ ला संविधानातील तरतुदीत सुधारणा करून अनुच्छेद २१(अ) नुसार शिक्षण हक्कास मूलभूत हक्काचा दर्जा देण्यात आला. पुढे २००९ मध्ये केंद्र सरकारने ‘बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा’ संमत केला. १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. सर्वदूर पोहोचत असलेला शिक्षण हक्क विषमतेचे बीजारोपण करणारा ठरू नये, अशी अपेक्षा आहे. अन्यथा भविष्यात शिक्षणातून निर्माण झालेली वर्गवारी देशाच्या सर्वांगीण प्रगतीतील मोठा अडथळा ठरेल.२००९ च्या कायद्यात वंचित, दुर्बल, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील विद्यार्थ्यांचे हित साधण्यासाठी आवश्यक असलेल्या तरतुदी करण्यात आल्या. या विद्यार्थ्यांना अनुदानित शाळा, शासकीय शाळा/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व खासगी विनाअनुदानित शाळा अशा सर्व प्रकारच्या शाळांमध्ये २५ टक्के आरक्षण देण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरे गटाचा वचननामा जाहीर!

## शेतकरी कर्जमुक्त करू, पीकविम्याचे निकष बदलू - ठाकरे

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील पळवलेले उद्योगधंदे पुन्हा वापस आणू, राज्याचे वैभव पुन्हा मिळवून देऊ, राज्यातील तरुण-तरुणींच्या हाताला रोजगार मिळवून देऊ, प्रत्येक जिल्हा व ग्रामीण रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रणा आणून रुग्णसेवा चांगली केली जाईल. महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त करून पीकविमा योजनेचे निकष बदलून टाकू ज्यामुळे शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई दिली जाईल, अशी घोषणा उद्धव ठाकरे यांनी वचननामा जाहीर करताना केली.**



शिवसेना नेते दिवाकर रावते व संजय राऊत यांच्या उपस्थितीत शिवसेना (ठाकरे गट) वचननामा जाहीर करण्यात आला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. उद्धव ठाकरे म्हणाले की, दहा वर्ष देशाची सत्ता यांच्याकडे होती. 2014 आम्ही युतीमध्ये होतो. युतीतील घटक पक्ष म्हणून आम्ही राष्ट्रपतींकडे गेलो होतो. राष्ट्रपती देखील आश्चर्यचकित झाले होते. कारण एका पक्षाची सत्ता आली होती. त्यानंतर त्यांनी नोटबंदी केली. 370 कलम हटवले तेव्हाही आम्ही सोबत राहिलो. मात्र, आता त्यांची पाशवी इच्छा समोर आली आहे. आता त्यांना घटनाच बदलायची आहे. काँग्रेसने आणि राष्ट्रवादीने जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. इंडिया आघाडीचा जाहीरनामा पूर्ण करुन घेण्यासाठी कटीबद्ध असणार आहोत, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. मोदी-शहांच्या मनात महाराष्ट्रद्वेष आहे. त्यांची सत्ता जाणार असल्याने ते रामराम करत देशभर फिरत आहेत. पण, आमच्या गीतात भवानी मातेचे नाव आले तर यांना त्रास होऊ लागला आहे.

कारण मोदी शहा यांना महाराष्ट्राबद्दल प्रेम नाही. ते अजूनही तुळजाभवानी मातेच्या मंदिरात का गेले नाहीत?, असा सवाल करत उद्धव ठाकरेंनी भाजप नेत्यांना टोला लगावला. जेव्हा आमची भाजपसोबत युती होती तेव्हा देखील आमचा वचननामा वेगळा होता.

त्यामुळे यावेळी आम्ही आमचा वचननामा स्वतंत्र जाहीर केला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीच्या जाहीरनाम्या व्यतिरिक्त महाराष्ट्राच्या हिताचे जे मुद्दे आहेत ते आम्ही आमच्या वचननामा जाहीर करत आहोत, त्यामुळे आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत. आम्हाला हुकूमशाही संपवायची आहे. त्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. गुजरात देखील आमचाच आहे. त्यामुळे आम्ही गुजरात विरोधात आहोत का अजिबात नाही. पण जे महाराष्ट्रातील महत्त्वाचे उद्योग हिसकावून गुजरात मध्ये नेले गेले, ते आम्ही पुन्हा होऊ देणार नाही, त्यासाठी शिवसेना काम करेल, असेही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले.उद्धव ठाकरे म्हणाले की, पर्यावरण स्नेही उद्योग राज्यात आणू. तर पर्यावरणाला घातक असलेल्या प्रकल्पांना आमचा विरोध कायम राहणार आहे. विशेष करून केंद्रामध्ये इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर आम्ही पाच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती पुढील पाच वर्षे स्थिर कशा राहील, यासाठी आग्रही राहणार आहोत.

### ते रामराम करत देशभर फिरत आहेत

इंडिया आघाडी म्हणून व एक मित्रपक्ष म्हणून आम्ही काम करणार आहोत, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.वसेना नेते दिवाकर रावते व संजय राऊत यांच्या उपस्थितीत शिवसेना (ठाकरे गट) वचननामा जाहीर करण्यात आला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. उद्धव ठाकरे म्हणाले की, दहा वर्ष देशाची सत्ता यांच्याकडे होती. 2014 आम्ही युतीमध्ये होतो. युतीतील घटक पक्ष म्हणून आम्ही राष्ट्रपतींकडे गेलो होतो. राष्ट्रपती देखील आश्चर्यचकित झाले होते. कारण एका पक्षाची सत्ता आली होती. त्यानंतर त्यांनी नोटबंदी केली. 370 कलम हटवले तेव्हाही आम्ही सोबत राहिलो. मात्र, आता त्यांची पाशवी इच्छा समोर आली आहे. आता त्यांना घटनाच बदलायची आहे. काँग्रेसने आणि राष्ट्रवादीने जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. इंडिया आघाडीचा जाहीरनामा पूर्ण करुन घेण्यासाठी कटीबद्ध असणार आहोत, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. मोदी-शहांच्या मनात महाराष्ट्रद्वेष आहे. त्यांची सत्ता जाणार असल्याने ते रामराम करत देशभर फिरत आहेत. पण, आमच्या गीतात भवानी मातेचे नाव आले तर यांना त्रास होऊ लागला आहे.

---

# यंदा समुद्राला पावसाळ्यात २२ दिवस मोठी भरती!

## यंदा सर्वात मोठी भरती कोकणवासियांना अनुभवता येणार

। अलिबाग । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोकण किनारपट्टीवर यंदा पावसाळ्यात २२ दिवस समुद्राला मोठी उधाणं (भरती) येणार आहेत. त्यामुळे या काळात साडेचार मीटर हून अधिक उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. २० सप्टेंबरला पावसाळ्यातील सर्वात मोठी भरती कोकणवासियांना अनुभवता येणार आहे.**



दरवर्षी पावसाळ्यात समुद्राला मोठी उधाण येत असतात. या उधाणांचा किनारपट्टीवरील भागांना बरेचदा तडाखा बसत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्व समुद्राला येणाऱ्या संभाव्य मोठ्या भरतीचे अंदाजपत्रक आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत जाहीर केले जाते. या दिवशी मच्छीमारांना तसेच किनारपट्टीवरील नागरिकांना सतर्कतेचे आदेश दिले जात असतात. यावर्षी पावसाळ्यात २२ दिवस मोठी उधाण येतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात जून मधील सात, जुलै मधील चार, ऑगस्ट मधील पाच, आणि सप्टेंबर मधील सहा दिवसांचा समावेश आहे. या दिवशी समुद्राला साडे चार मीटर पेक्षा अधिक मोठी भरती येणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर समुद्र, खाडी तसेच नदी किनाऱ्यावरील गावांना स्थानिक पातळवीर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात नदी, खाडी आणि समुद्र किनाऱ्यावर एकूण ३८५ गावे आहेत. या गावांना स्थानिक पातळीवर नियोजन करण्याबाबतचे आदेश रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिले आहेत.

### मोठी भरती असलेले धोक्याचे दिवस


या कालावधीत उधाणांचे पाणी किनारपट्टीवरील भागात शिरण्याची शक्यता असते. समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे शेतात खारेपाणी शिरून जमीन नापीक होऊ शकते. सखल भागात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. याच कालावधीत अशातच मोठा पाऊस झाल्यास, पाण्याचा निचरा होण्यास अडसर होतो. ज्यामुळे नद्या, नाल्यांना पूर देखील येऊ शकतो.या उधाणांचा किनारपट्टीवरील भागांना बरेचदा तडाखा बसत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्व समुद्राला येणाऱ्या संभाव्य मोठ्या भरतीचे अंदाजपत्रक आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत जाहीर केले जाते. या दिवशी मच्छीमारांना तसेच किनारपट्टीवरील नागरिकांना सतर्कतेचे आदेश दिले जात असतात. यावर्षी पावसाळ्यात २२ दिवस मोठी उधाण येतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात जून मधील सात, जुलै मधील चार, ऑगस्ट मधील पाच, आणि सप्टेंबर मधील सहा दिवसांचा समावेश आहे.

# 13 राज्यांतील 88 जागांसाठी आज मतदान!

## एका केंद्रशासित प्रदेशातील 88 जागांवर मतदान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**2024 लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात शुक्रवारी (26 एप्रिल) 12 राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील 88 जागांवर मतदान होणार आहे. यापूर्वी या टप्प्यात 89 जागांवर मतदान होणार होते, मात्र मध्य प्रदेशातील बैतुल जागेवर बसपाच्या उमेदवाराचा मृत्यू झाल्याने आता या जागेवर 7 मे रोजी निवडणूक होणार आहे. 2019 मध्ये भाजपने या जागांवर सर्वाधिक 50 जागा जिंकल्या होत्या आणि NDA मित्रपक्षांनी 8 जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसला 21 जागा मिळाल्या होत्या. तर, अन्य पक्षांना 9 जागा मिळाल्या होत्या.**

निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात 1,198 उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये 1,097 पुरुष आणि 100 महिला उमेदवार आहेत. एक उमेदवार तृतीयपंथी आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मने 1,192 उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रात दिलेल्या माहितीचा अहवाल तयार केला. त्यापैकी 21% म्हणजेच 250 उमेदवारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. 390 म्हणजे 33% उमेदवार करोडपती आहेत. त्यांच्याकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची संपत्ती आहे. सहा उमेदवारांनी त्यांची संपत्ती शून्य घोषित केली आहे, तर तिघांची मालमत्ता 500 ते 1,000 रुपये आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म च्या अहवालानुसार 14 टक्के म्हणजेच 167 उमेदवारांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. खून, अपहरण यासारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. 3 उमेदवारांवर खुनाचा तर 24 जणांवर खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल आहेत. 25 उमेदवारांवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी एकावर बलात्काराचा गुन्हाही दाखल आहे. त्याच वेळी, 21 उमेदवारांवर द्वेषयुक्त भाषणाशी संबंधित गुन्हे दाखल आहेत. केरळ भाजपचे अध्यक्ष आणि वायनाड मतदारसंघातील उमेदवार के. सुरेंद्रन यांच्यावर सर्वाधिक 243 गुन्हे दाखल आहेत. त्याचवेळी राज्यातील एर्नाकुलम मतदारसंघातून भाजपचे उमेदवार डॉ. के.एस. राधाकृष्णन यांच्यावर 211 गुन्हे दाखल आहेत. तिसऱ्या क्रमांकावरील इडुक्की मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार डीन कुरियाकोसे यांच्यावर 88 गुन्हे दाखल आहेत. दुसऱ्या टप्प्यातील 1,192 उमेदवारांपैकी 390 म्हणजेच 33 टक्के कोट्यधीश आहेत. त्यांच्याकडे एक कोटी किंवा त्याहून अधिक किमतीची संपत्ती आहे. उमेदवारांची सरासरी मालमत्ता 5.17 कोटी रुपये आहे. सहा उमेदवारांनी त्यांची संपत्ती शून्य घोषित केली आहे, तर तिघांची संपत्ती 300 ते 1,000 रुपये आहे. देड, महाराष्ट्रातील अपक्ष उमेदवार लक्ष्मण नागोराव पाटील यांची एकूण संपत्ती 500 रुपये आहे. कासारगोड, केरळ येथील राजेश्वरी केआर यांनी एकूण 1,000 रुपये आणि अमरावती, महाराष्ट्रातील पृथ्वीसम्राट मुकिंदराव दीपवंश यांनी एकूण 1,000 रुपयांची मालमत्ता जाहीर केली आहे. केरळमधील वायनाड जागेवर तिरंगी लढत होत आहे. 2019 मध्ये राहुल गांधींनी येथून पहिल्यांदा निवडणूक लढवली आणि जिंकले. मात्र, अमेठीतून त्यांचा भाजपच्या स्मृती इराणी यांच्याकडून पराभव झाला. यावेळी INDI ब्लॉकचा आणखी एक पक्ष असलेल्या CPI(M) ने राहुल गांधींच्या विरोधात महिला उमेदवार ॲनी राजा यांना उभे केले आहे. तर भाजपचे केरळ प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांना तिकीट देण्यात आले आहे. ॲनी राजा या सीपीआयचे सरचिटणीस डी राजा यांच्या पत्नी आहेत. ॲनी राजा यांनी वायनाडमधून निवडणूक लढवण्याच्या राहुल गांधींच्या निर्णयाला डाव्या पक्षांना कमकुवत करण्याचे षड्यंत्र म्हटले आहे. सुरेंद्रन हे सबरीमाला आंदोलनाचा प्रमुख चेहरा होते. त्यादरम्यान त्यांना 21 दिवस तुरुंगातही राहावे लागले.

### प्रल्हाद गुंजाळ यांना उमेदवारी

» सुरेंद्रन यांच्यावर 243 गुन्हे दाखल आहेत. तिरुवनंतपुरम मतदारसंघातून तीन वेळा काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांच्या विरोधात भाजपने केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांना तिकीट दिले आहे. राजीव 2006 पासून राज्यसभेचे सदस्य आहेत. 2018 मध्ये ते तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवडून आले आणि 2021 मध्ये त्यांना केंद्रीय मंत्री करण्यात आले. जरी त्यांचा जन्म अहमदाबाद येथे झाला असला तरी त्यांचे वडिलोपार्जित घर त्रिशूर जिल्ह्यात आहे. शशी थरूर यांनी जवळपास 29 वर्षे यूएनमध्ये काम केले आहे. भारत सरकारने संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवपदासाठी शशी यांचे नाव दिले होते. निवडणुकीत ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले. यानंतर त्यांनी UN चा राजीनामा दिला आणि 2009 मध्ये राजकारणात प्रवेश केला. मनमोहन सिंग सरकारमध्ये ते परराष्ट्र राज्यमंत्री आणि मानव संसाधन विकास राज्यमंत्री राहिले आहेत. कोटा येथील भाजपचे उमेदवार 17 व्या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला आहेत. गेल्या दोन वेळा ते विजयी झाले आहेत. याआधी ते कोटा दक्षिणमधून तीन वेळा आमदारही राहिले होते. त्याचवेळी काँग्रेसने भाजपचे दोन वेळा आमदार राहिलेले प्रल्हाद गुंजाळ यांना उमेदवारी दिली आहे.

---

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा 'शपथनामा' जाहीर

## चाळीस वर्ष आधी काय झाले हे विचारू नये : शरद पवार

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याला 'शपथनामा' असे नाव देण्यात आले असून, यात अनेक घटकांतील लोकांना केंद्रस्थानी हा शपथनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रचार गीत देखील प्रसारित करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमाला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी खासदार वंदनाताई चव्हाण, युवक प्रदेशाध्यक्ष मेहमबूब शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणीताई खडसे, पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप या कार्यक्रमाला उपस्थित होते. आम्ही मर्यादित जागा लढवत आहोत विविध प्रश्नांसंबधी आम्ही मांडणी केली आहे, त्याबाबत आमचे लोकं संसदेत आवाज उठवतील असे शरद पवार यांनी यावेळी बोलताना स्पस्ट केले .वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी लोकं जाहीरनामा तयार करणाऱ्या समितीत आहेत. महिला आणि मुली, शेतकरी, कामगार, दिव्यांग, तृतीयपंथी, नागरी विकास, आरोग्य, पर्यावरण हे घटक डोळ्यासमोर ठेवून जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. पर्यटन, राष्ट्रीय सुरक्षा हे मुद्दे घेण्यात आले आहेत असे यावेळी वंदना चव्हाण यांनी सांगितले .महिला, तरुण, तसेच कामगार यांच्यासह जातनिहाय जनगणना, उद्योग, कर प्रणाली, नागरी विकास, पर्यावरण, पर्यटन, कला, सांस्कृतिक यासह शाळांचा सेफ्टी ऑडिट यांच्यासह अनेक मुद्यांचा या जाहीरनाम्यात समावेश समावेश करण्यात आला आहे.

### जाहीरनाम्यातील ठळक मुद्दे..

» विदर्भात गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यावर अमित शाह यांच्या कडे काय उत्तर आहे? असा सवाल जयंत पाटील यांनी यावेळी भाजपला विचारला . शरद पवार कृषीमंत्री असताना आत्महत्या पाहून मनमोहन सिंगांना विदर्भात आणून कर्जमाफी करायला सांगितली होती. आता राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने देखील मागणी केली त्याचा आनंद आहे असेही पाटील म्हणाले.

* डिग्री डिप्लोमा झाल्यानंतर पहिल्या वर्षी नोकरी मिळेपर्यंत 8,000 हजार रुपये स्टायपेन्ड देणार
* स्त्री शिक्षणातले अडथळे दूर करणार
* महिलांच्या सुरक्षेसाठी कडक कायदे करणार
* महिलांना तातडीने आरक्षण देण्याची मागणी करणार
* शेतकऱ्यांना किमान आधारभूत दर
* केंद्राचा हस्तक्षेप न करता एक आयोग निर्माण करणार


# ० वर्षांचा संसार, एक मुलगा अन् चार वर्षांपूर्वी घटस्फोट

बॉलीवूडमधील सर्वोत्तम अभिनेत्रींपैकी एक म्हणजे कोंकणा सेन शर्मा होय. तिने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली आहे. नुकत्याच आलेल्या ‘किलर सूप’ या सीरिजमधील अभिनयासाठी तिचं खूप कौतुक झालं. उत्तम दिग्दर्शिका व अभिनेत्री असलेली कोंकणा सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे.कोंकणाने २०१० मध्ये अभिनेता रणवीर शौरी याच्याशी लग्न केलं होतं. पण १० वर्षांच्या संसारानंतर ते २०२० मध्ये विभक्त झाले. या जोडप्याला एक मुलगा देखील आहे.

आता पुन्हा एकदा कोंकणाच्या आयुष्यात प्रेम आल्याचं म्हटलं जातंय. कोंकणा तिच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या अमोल पराशरला डेट करत असल्याचं म्हटलं जात आहे.४४ वर्षी कोंकणा व ३७ वर्षीय अभिनेता अमोल पराशर एकमेकांसह डेटिंग करत असल्याच्या चर्चा होत्या. यावर कोंकणाचा पूर्वाश्रमीचा पती रणवीर शौरीने प्रतिक्रिया दिली आहे. त्याची प्रतिक्रिया व्हायरल झाल्यानंतरच कोंकणा व अमोल खरंच रिलेशनशिपमध्ये असल्याचं म्हटलं जातंय.एका एक्स अकाउंटवरून



अमोलच्या इन्स्टाग्राम स्टोरीचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. यात अमोल एका राजकीय इव्हेंटबद्दल बोलतोय. त्याचा



स्क्रीनशॉट शेअर करताना लिहिलंय, ‘कोंकणा सेन शर्माने मोदी भक्त रणवीर शौरी सोडून धर्मनिरपेक्ष अमोल पराशरला डेट करण्याचा

सर्वात चांगला निर्णय घेतला.’ या पोस्टवर रणवीर शौरीने कमेंट केली आहे. “होय, मी पण सहमत आहे,” असं रणवीरने म्हटलंय. त्याने ही कमेंट करून कोंकणा व अमोलच्या नात्यावर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा होत आहे.कोंकणा व अमोलने ‘डॉली किट्टी और वो चमकते सितारे’ या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. या चित्रपटानंतर अनेकदा त्यांच्या अफेअरच्या अफवा पसरल्या होत्या, पण दोघांनीही यावर कधीच प्रतिक्रिया दिली नाही. आता रणवीरच्या या कमेंटनंतर पुन्हा कोंकणा व अमोलचं नातं चर्चेत आहे.

## करिश्मा कपूरचा जबरदस्त डान्स पाहिलात का?

दिल तो पागल हैं’ या १९९७ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटात शाहरुख खान, माधुरी दीक्षित व करिश्मा कपूर यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. चित्रपटाचं कथानक, गाणी अगदी सगळं काही लक्षवेधी होतं. परंतु, या सगळ्यात आजही लक्षात आहे तो म्हणजे दोन्ही प्रमुख अभिनेत्रींनी एकत्र केलेला जबरदस्त डान्स. माधुरी आणि करिश्माने प्रचंड मेहनत करून ‘दिल तो पागल हैं’ चित्रपटात आपल्या नृत्याची झलक दाखवली होती. ‘दिल तो पागल हैं’मध्ये माधुरी दीक्षितने पूजा तर, करिश्मा कपूरने निशा हे पात्र साकारलं होतं. निशाच्या पायाला दुखापत झाल्यावर राहुल म्हणजेच शाहरुख खान पूजाला लीड डान्सर बनवतो अन् पुढे राहुल-पूजाची लव्हस्टोरी कशी फुलते या गोष्टी प्रेक्षकांना चित्रपटात पाहायला मिळतात. परंतु, यामध्ये पूजा आणि निशाची एका सीनमध्ये डान्सिंग जुगलबंदी पाहायला मिळते.

## बाबांकडे जावंस वाटतं

दिवंगत अभिनेते इरफान खान यांनी त्यांच्या विविधांगी भूमिकांमधून प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यांच्या अभिनयाच कौतुक आजही मनोरंजसृष्टीत केलं जातं. ‘पान सिंग तोमर’, ‘अंग्रेजी मीडियम’, ‘लाईफ ऑफ पाय’ अशा अनेक चित्रपटामध्ये त्यांनी उत्कृष्ट भूमिका साकारली. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवत त्यांचा मुलगा बाबिल खानही सिनेसृष्टीत उतरला.अन्विता दत्त लिखित, दिग्दर्शित ‘कला’ या चित्रपटाद्वारे बाबिलने सिनेसृष्टीत पदार्पण केलं. बाबिल सोशल मीडियावर कायम सक्रिय असतो. अभिनयासह वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही तो चाहत्यांबरोबर शेअर करत असतो. परंतु, अचानक बाबिलने त्याच्या सोशल मीडियावर असं काही शेअर केलं ज्यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला.२४ एप्रिलला रात्री बाबिल खानने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक स्टोरी शेअर केली होती. यात त्याने लिहिलं होतं की, “कधी कधी मला हार मानावीशी वाटते आणि सगळं सोडून बाबांकडे जावस वाटतं.” बाबिलच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. दरम्यान बाबिलने ही पोस्ट आता डीलीट केली असली तरी त्याच्याबद्दल काळजी व्यक्त केली जात आहे.



## अभिनेत्री तमन्ना भाटिया अडचणीत

बॉलीवूड अभिनेत्री तमन्ना भाटिया अडचणीत सापडल्याचं दिसतंय. महाराष्ट्र सायबर सेलने तमन्नाला समन्स बजावलं आहे. फेअरप्ले ॲपवर आयपीएल २०२३ च्या बेकायदेशीर स्ट्रीमिंगबाबत तमन्नाला चौकशीसाठी बोलावण्यात आलंय. या स्ट्रीमिंगमुळे वायकॉमचं कोट्यवधी रुपयांचं नुकसान झालंय. तिला २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र सायबर सेलसमोर हजर राहण्यास सांगण्यात आलं आहे. तमन्ना भाटियाने फेअरप्लेचं प्रमोशन केलं होतं, त्यामुळे तिची या प्रकरणी चौकशी केली जाईल. तिला साक्षीदार म्हणून चौकशीसाठी बोलावण्यात येत आहे. फेअरप्लेच्या प्रमोशनसाठी तिच्याशी कोणी संपर्क साधला होता आणि त्यासाठी तिला किती पैसे मिळाले, यासंदर्भात तिची चौकशी केली जाणार आहे. ‘एएनआय’ने याबद्दल वृत्त दिलं आहे.तमन्ना भाटियाआधी २३ एप्रिल रोजी अभिनेता संजय दत्तलाही या प्रकरणी समन्स बजावण्यात आलं आहे. पण, संजय सध्या मुंबईत नाही, त्यामुळे दिलेल्या तारखेला हजर राहू शकत नसल्याचं त्याने म्हटलं आहे. त्याने आपला जबाब नोंदवण्यासाठी तारीख आणि वेळ मागितली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वायकॉमने महाराष्ट्र सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी तपास केला जात असून त्याचसंदर्भात तमन्ना भाटिया आणि संजय दत्त यांना चौकशीसाठी समन्स पाठवण्यात आले आहे. या प्रकरणी रॅपर बादशहाचा जबाबही नोंदवण्यात आला आहे. फेअरप्लेवर बेकायदेशीरपणे आयपीएलचं स्ट्रीमिंग केल्याने वायकॉमचं मोठं नुकसान झाल्याचं म्हटलं जातंय.



## ‘जाड’ म्हणणाऱ्यांना लारा दत्ताने सुनावलं

मिस युनिव्हर्स आणि अभिनेत्री लारा दत्ता सध्या तिच्या आगामी ‘स्ट्रॅटेजी: बालाकोट अँड बियॉन्ड’ या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. लाराने तिच्या करिअरमध्ये अनेक सुपरहिट सिनेमे केले आहेत. मागच्या काही काळापासून अभिनयक्षेत्रापासून दूर असणारी लारा आता कमबॅक करत आहेत. या सीरिजच्या निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत तिने घाणेरड्या कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिचं मत मांडलं आहे. नुकत्याच ‘पिंकविला’ला दिलेल्या मुलाखतीत लाराने नकारात्मक कमेंट्स व ट्रोलिंगबद्दल तिला काय वाटतं ते सांगितलं. “वैयक्तिकरित्या मी सोशल मीडियावर फारशी सक्रिय नाही. मी सोशल मीडियावर तितकीच सक्रिय आहे जितकी मला व्हायचं आहे. जर मला सतत फॉलोअर्स, लाईक्स आणि कमेंट्सची पाहिजे असतील, तर मला त्यासोबत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी तयार राहावं लागेल,” असं लारा म्हणाली.लाराने फॉलोअर्स कमी असण्याबाबत म्हणाली, “माझ्या सोशल मीडिया फीडमध्ये माझ्यासाठी खास गोष्टी आहेत, या खास गोष्टी जे माझे खरे फॉलोअर्स आहेत त्यांच्यासह मला त्या शेअर करायच्या आहेत. म्हणूनच माझे फारसे फॉलोअर्स नाहीत, पण जे लोक सोशल मीडियावर खरे आहेत, ते कधीच तुम्हाला वाईट बोलणार नाहीत. मला खूप ट्रोलिंग आणि अश्लील कमेंट्ससारख्या गोष्टींना सामोरं जावं लागत नाही, असं मला वाटतं.”लारा दत्ता म्हणाली, “लोकांना त्यांची मतं मांडण्याचा अधिकार आहे, ते मला म्हातारी म्हणतील, जाड म्हणतील, पण या सर्व गोष्टींमुळे माझ्या आयुष्यात काही फरक पडणार आहे का? मला माहित आहे की ट्रोलिंग करणारे काही नावं नसलेले लोक आहेत आणि ते त्यांच्या आयुष्यात काय करत आहेत हे मला माहित नाही, त्यामुळे मी कोणाबद्दलही बोलू शकत नाही.”कामाबद्दल बोलायचं झाल्यास लारा लवकरच ‘वेलकम टू द जंगल’ या चित्रपटात दिसणार आहे.

# एका महिन्यानंतर आरसीबीने विजय नोंदवला

## आरसीबीने सनरायझर्स हैदराबादचा 35 धावांनी पराभव केला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएलच्या १७व्या हंगामातील ४१ वा सामना राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने होते. ज्यामध्ये आरसीबीने सनरायझर्स हैदराबादचा ३५ धावांनी पराभव केला. यंदाच्या हंगामातील आरसीबीचा हा दुसरा विजय, तर सनरायझर्स हैदराबादचा तिसरा पराभव ठरला. आरसीबीने बरोबर एका महिन्यानंतर दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने विराट-रजतच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २०६ धावांचा डोंगर उभारला होता. मात्र, प्रत्युत्तरात हैदराबादचा संघ १७१ धावांच करु शकला.**




या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २० षटकांत ७ गडी गमावून २०६ धावा केल्या. विराट कोहलीने या सामन्यात आरसीबीसाठी ४३ चेंडूत सर्वाधिक ५१ धावा केल्या. त्याचबरोबर रजत पाटीदारने या सामन्यात २५० च्या स्ट्राईक रेटने २० चेंडूत ५० धावा केल्या. या दरम्यान पाटीदारने २ चौकार आणि ५ षटकार मारले. कॅमेरून ग्रीननेही २० चेंडूत नाबाद ३७ धावा केल्या. हैदराबादकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.२०७ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. ट्रॅव्हिस हेडला केवळ १ धाव करता आली. एडन मार्करमनेही केवळ ७ धावांचे योगदान दिले. अभिषेक शर्माने १३ चेंडूत ३१ धावा केल्या, पण त्याला मोठी खेळी खेळता आली नाही. सनरायझर्स हैदराबाद संघाने सातत्याने विकेट गमावल्या, त्यामुळे संपूर्ण संघ २० षटकात ८ विकेट गमावून केवळ १७१ धावा करू शकला. शाहबाज अहमदने संघासाठी नाबाद ४० धावा निश्चित केल्या. कर्णधार पॅट कमिन्सनेही ३१ धावा केल्या. पण ते दोघेही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. आरसीबीकडून स्वप्निल सिंग, कर्ण शर्मा आणि कॅमेरुन ग्रीने यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर विल जॅकने एक विकेट घेतली.आयपीएल २०२४ मध्ये सनरायझर्स हैदराबाद आपल्या घरच्या मैदानावर वर्चस्व गाजवत आहे. या सामन्यापूर्वी, सीझनमधील हा एकमेव संघ होता. ज्याने घरच्या मैदानावर एकही सामना गमावला नव्हता. मात्र आरसीबी संघाने हे वर्चस्व संपुष्टात आणले आहे. या सामन्यापूर्वी सनरायझर्स हैदराबादने या मोसमात घरच्या मैदानावर २ सामने खेळले होते. हे दोन्ही सामने संघाने जिंकले होते. आरसीबीने बरोबर एका महिन्यानंतर आणि ६ पराभवानंतर यंदाच्या हंगामातील आपला दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २० षटकांत ७ गडी गमावून २०६ धावा केल्या. विराट कोहलीने या सामन्यात आरसीबीसाठी ४३ चेंडूत सर्वाधिक ५१ धावा केल्या. त्याचबरोबर रजत पाटीदारने या सामन्यात २५० च्या स्ट्राईक रेटने २० चेंडूत ५० धावा केल्या. या दरम्यान पाटीदारने २ चौकार आणि ५ षटकार मारले. कॅमेरून ग्रीननेही २० चेंडूत नाबाद ३७ धावा केल्या. हैदराबादकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या.२०७ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. ट्रॅव्हिस हेडला केवळ १ धाव करता आली. एडन मार्करमनेही केवळ ७ धावांचे योगदान दिले. अभिषेक शर्माने १३ चेंडूत ३१ धावा केल्या, पण त्याला मोठी खेळी खेळता आली नाही.

### पॅट कमिन्सनेही 31 धावा केल्या

सनरायझर्स हैदराबाद संघाने सातत्याने विकेट गमावल्या, त्यामुळे संपूर्ण संघ २० षटकात ८ विकेट गमावून केवळ १७१ धावा करू शकला. शाहबाज अहमदने संघासाठी नाबाद ४० धावा निश्चित केल्या. कर्णधार पॅट कमिन्सनेही ३१ धावा केल्या. पण ते दोघेही संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. आरसीबीकडून स्वप्निल सिंग, कर्ण शर्मा आणि कॅमेरुन ग्रीने यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर विल जॅकने एक विकेट घेतली.आयपीएल २०२४ मध्ये सनरायझर्स हैदराबाद आपल्या घरच्या मैदानावर वर्चस्व गाजवत आहे. या सामन्यापूर्वी, सीझनमधील हा एकमेव संघ होता. ज्याने घरच्या मैदानावर एकही सामना गमावला नव्हता. मात्र आरसीबी संघाने हे वर्चस्व संपुष्टात आणले आहे.

# विराट कोहलीने केला अनोखा विक्रम

## IPL इतिहासात 'हा' पराक्रम करणारा ठरला पहिलाच खेळाडू

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबादचे संघ आमनेसामने आहेत. या सामन्यात आरसीबी संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने विराट कोहली आणि रजत पाटीदारच्या अर्धशतकाच्या जोरावर ६ गडी गमावून २०६ धावांचा डोंगर उभारला. दरम्यान या सामन्यात विराट कोहलीने एक खास विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने असा विक्रम केला आहे, जो आयपीएलच्या इतिहासात याआधी कोणत्याही खेळाडूला करता आला नाही.**




सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध खेळला जाणारा सामना हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल इतिहासातील २५० वा सामना आहे. तर विराट कोहली आरसीबीच्या पहिल्या सत्रापासून संघासोबत आहे. आयपीएलच्या इतिहासातील तो पहिला खेळाडू ठरला आहे, जो संघाच्या पहिल्या आणि २५० व्या अशा दोन्ही सामन्यांच्या प्लेइंग इलेव्हनचा भाग आहे. याआधी केवळ मुंबई इंडियन्सने आयपीएलमध्ये २५० किंवा त्याहून अधिक सामने खेळले आहेत. पण मुंबईच्या २५० व्या सामन्यात संघाच्या पहिल्या सामन्यात खेळलेला एकही खेळाडू नव्हता. या सामन्यात विराट कोहलीने ४३ चेंडूचा सामना करताना ४ चौकार आणि १ षटकार मारत ५१ धावांची खेळी साकारली.जयदेव उनाडकटसाठीही हा सामना खूप खास आहे. जयदेव उनाडकटच्या आयपीएल कारकिर्दीतील हा १०० वा सामना आहे. १०० किंवा त्याहून अधिक सामने खेळणारा जयदेव उनाडकट आयपीएलमधील ६६ वा खेळाडू ठरला आहे. जयदेव उनाडकट २०१० पासून आयपीएलमध्ये खेळत आहे. त्याचबरोबर या मोसमातील त्याचा हा सहावा सामना आहे. या खास सामन्यात अविस्मरणीय कामगिरी केली आहे. त्याने या सामन्यात ३० धावा देत ३ विकेट्स आपल्या नावावर केल्या. आरसीबीला शानदार सुरुवात करुन देताना विराट कोहली आणि फाफ डु प्लेसिस यांनी चौथे षटक संपण्यापूर्वीच ४८ धावांवर पोहोचवले होते. डु प्लेसिस ४८ धावांवर बाद झाला, त्याने १२ चेंडूत २५ धावा केल्या. यानंतर विल जॅक केवळ ६ धावा करून बाद झाला. दरम्यान, विराट कोहली आणि रजत पाटीदार यांच्यातील ६५ धावांच्या भागीदारीने आरसीबीचा डाव सावरला आहे. १५ षटकांनंतर आरसीबीची धावसंख्या ४ गड्यांच्या मोबदल्यात १४२ धावा होती, पण येथून कॅमेरून ग्रीनचे वादळ आले.

### पाटीदारने 20 चेंडूत 50 धावा केल्या

त्यामुळे आरसीबी संघाने १८ षटकांत १७९ धावा केल्या होत्या. शेवटच्या २ षटकांमध्येही आरसीबीचे फलंदाज आक्रमकपणे बॅट फलंदाजी करताना दिसले. एसआरएच कर्णधार पॅट कमिन्सने पहिल्यादा १९व्या षटकात १५ धावा दिल्या, तर टी नटराजननेही शेवटच्या षटकात १२ धावा दिल्या. यासह २०० धावांचा टप्पा पार करण्यात आरसीबी संघाला यश आले. आरसीबीकडून रजत पाटीदारने अवघ्या २० चेंडूत ५० धावा केल्या.